# गोड गुपित

**(लघुकथा)**

***लेखिका – उमा सुरेश बापट***

*02 August 2020*

मीराताई नातवाला झोपवत होत्या. सकाळपासून त्याच्यामागे धावून त्या दमल्या होत्या. हॉलमधे पसारा पडला होता. दादा (आजोबा) चिडलेले होते त्यामुळे.

त्यांनी तरी कुठे पडायचं दुपारी? एकच पलंग होता हॉलमधे. तोच सोफा, तोच दीवाण, तीच सेटी. खाली चटई पसरून नातवाला झोपवून त्याही आडवारल्या. एक बेडरूम, ती जितेन सुरुचिची खोली झाली होती.

तिथे तर फक्त गाद्या होत्या दोन. गाद्या पसरून दोघे चिरागला मधे घेऊन झोपत.

आताशा मीराताईना काम झेपत नव्हतं. पण मूक स्वभावानुसार त्या निमूट सारं काही सहन करत. परवा मात्र त्याना रहावे ना. दादाना ताप आला होता. उन्हाळी ताप, सीरिअस काही नव्हतं. पण दादा त्याना नाचवत होते. चिरागला संभाळत दादांना खाणं, चहा, औषध देताना त्यांची दमछाक होत होती. त्या सुरूचिला मोघम म्हणाल्या, "चिरागला संभाळायला बाई ठेवायची का? म्हणजे मला हाताशी फक्त. तसं मीच पहाणार त्याला. आगाशेकाकूंच्या ओळखीनं मिळते आहे एक मावशी."

पण सुरूचि काहीच बोलली नाही.

परत विषय काढणं नको वाटलं. मग तो विषय मागे पडला. 'आज परत बोलून पाहू.' आपल्याला इतरांसारखं मनात येईल ते करता येत नाही. स्वभाव पडला भिडस्त. आणि आर्थिक बळ नाही.

दादा कुठल्याच नोकरीत धड टिकले नाहीत कधी. त्यामुळे फंड, पेन्शन चा प्रश्नच नव्हता. त्यांनीच लोणची पापड विकून चरितार्थ चालवला होता. काटकसर, अपुरेपण नशीबालाच लागलं होतं.

जितेन हुषार निघाला. शिक्षण घेऊन यश दिलन.

चांगली नोकरी लागली. घरखर्च भागू लागला. सुरूचि चार भावंडातली. तिला वडील नव्हते. तिच्या आईनं कष्टानं मुलं वाढवली होती. तर ती पण गरीब घरची व काटकसरी. तिला नोकरी होती. पण ठराविक रक्कम ती तिच्या आईला दरमहा पाठवत होती. मीराताईंचा याला विरोध नव्हता. पण आता सुरूचिचा धाकटा भाऊ नोकरीला लागला होता. चांगला पगार मिळवत होता. आता थोडा खर्च आपल्या घरात केला तिनं तर चालण्यासारखं होतं. पण अनेक गोष्टीत सांगूनही जितू सुरूचि लक्ष देत नव्हते.

आताही तिनं उडवाउडवी केली. मीराताईंनी सुस्कारा टाकून विषय मनावेगळा केला. आयुष्यभर, त्यांनी तेच तर केलं होतं. चिरागला झोप लागली तशी त्या आळस झटकून ऊठल्याच. कणीक मळून भाजी चिरायला घेतली. पण मन खिन्न झालंच.

वाणीसामान येऊन पडलं होतं. ते सगळं नीट पाहून डब्यात, भरून ठेवायचं होतं. पालेभाज्या स्वच्छ, धुवून, पुसून निवडून पेपरात गुंडाळून फ्रिजमधे ठेवायच्या होत्या. कामाची रांग संपतच नव्हती. तरी बरं, फ्रिज होता घरी. पूर्वीचे दिवस मीराताईना आठवले. अन्न उरलं कि तसराळ्यात, थंड पाणी घालून त्यात, उरलेल्या जेवण भांड्यांच्यात, काढून ठेवावं लागे. "देशी फ्रिज" च म्हणायचा तो!!

जितू व सुरूचिनं फारशी खळखळ न करता फ्रिज घेऊन फार बरं केलं होतं.

चहा केला, पण दादाना जाग आली म्हणून त्यानाच कप नेऊन दिला. मग परत स्वतः साठी केलाच नाही चहा. आज सगळं विषवत वाटत होतं. काय मिळवलं एवढे कष्ट काढून? सासरी गरीबी, सोवळं, सासुरवास सगळं सोसावं लागलं. दादांचा लहरी स्वभाव. जुळवून घ्यावं लागलं. गरीब शाळामास्तराच्या मुलीला तेच करणं भाग होतं

घरात अठराविश्वे दारिद्र्य होतं. सासरी तेच. दादांच्या दूरच्या मामाची ही जागा भाड्यानं मिळाली म्हणून संसार तरी झाला. मीराताईंनी पदरानं डोळे टिपले.

परवाचीच गोष्ट, उपासाला साबुदाणे, शेंगदाणे आण म्हटलं तर सुरूनं विसरल्याचा बहाणा केला. मग केळी खाऊन त्यांनी व दादांनी भागवलं. ती तरी स्वस्त कुठे राहिली आहेत?

मीराताई उदास झाल्या. काल बागेत बायकांच्यात बसल्या असता, नेनेकाकू म्हणाल्या तेच खरं, "अहो पैसा आहे तर सगळं आहे. नाहीतर पोटची मुलं देखील विचारत नाहीत".

त्या, दिवशी बागेतल्या मैत्रिणींची ट्रिप ठरली होती. शहद, टिटवाळ्याला जाऊन देवदर्शन घेऊन परत यायचं होतं. जेवण, चहा, नाश्ता सगळं ठेवलं होतं. जाणं येणं सगळं मिळून पाचशे रुपये प्रत्येकी ठरले होते. स्वतः एकटी साठी एकदम पाचशे रूपये मागणं त्यांच्या जिवावर आलं होतं. सगळ्या बायका म्हणत होत्या "चला हो मीराताई. अहो हातपाय चालतायत तोवर जाऊन यायचं. पुढे जाऊ म्हटलं तरी शक्य होणार नाही."

पण मीराताईंनी "चिराग व दादा दोघांची अडचण होईल" अशी सबब सांगून जाणं टाळलं. अशी मन मारायची सवयच होती त्याना. सगळी सोंगं आणता येतात पण पैशाचं सोंग आणता येत नाही.

मैत्रिणींपैकी एक जण सुरुचिला रस्त्यात भेटल्या." पाठव की ग सासूबाईना ट्रिपला" तिला म्हणाल्या. सुरुचि ते घरात बोलली. "आई, अग तिथे फार काही पहाण्यासारखं नाही. आपण घरचे सगळे मिळून जाऊ कधीतरी" जितू स्वतःच विषय काढून म्हणाला. "अरे हो जितू, मी कुठे काय म्हटलंय?घरचं टाकून कशी जाईन मी? सुरूचि अग मी परवाच जमणार नाही सांगितलय सगळ्याना" तोंडावर पाणी मारत त्यांनी अश्रू बेमालूम लपवले.

एकीकडे स्वयपाक चालूच होता. चिरागला खाऊ म्हणून अगदी कमी तुपात वाटीभर शिरा केला. तो उठल्यावर त्याला खाऊ घातला, कपडे बदलून त्याला खेळायला पाठवला. पिंप घासून घेतलं.

पाणी भरायचं होतं. पाणी आलं तशी त्यांची लगबग उडाली. जितू सुरू आले संध्याकाळी. त्या दोघाना चहा करून दिला.

सुरूचि पुढच्या स्वयपाकाला लागली. जेवणं न बोलताच पार पडली. त्या उदासच होत्या. मागचं आवरून त्यांनी भांडी घासून टाकली. सकाळी स्वयपाकाला हवी म्हणून. दादाना दोन चिकू कापून दिले जेवल्यावर. त्यांनी पण दोन फोडी खाल्ल्या.दिवा घालवून त्या गादीवर आडव्या झाल्या. दादा घोरायला लागले होते कधीच. जितू सुरूचि दोघं ऑफिसचं काम करत होते उशीरापर्यंत.

"हुं! काय करायचंय एवढं काम करून? आणि आपण कशाला काय वाटून घ्यायचंय? करताहेत स्वतःच्याच संसारासाठी." आपल्याला झालंय काय तेच मीराताईना कळेना.

आताशा त्याना सारखं वाटू लागलं होतं कि जितू आपला राहिला नाही. तोही बायकोच्याच विचारानं वागतो. आईचे कष्ट विसरला अगदीच. दादा आयुष्यभर फारसं काही करू शकले नव्हते. तेही ओशाळेच असत. मुलासुनेपुढे फारसं बोलत नसत.

मीराताई बागेतही क्वचितच जाऊ लागल्या. मोजक्या दोन साड्या होत्या बाहेरच्या अशा. सारखं तेच नेसून गेलं कि बायका हसतात असं वाटे त्यांना. मधे त्या बागेत गेल्या, तर सगळ्या बोलायच्या एकदम थांबल्या. "आपल्याबद्दलच असणार काहीतरी". त्यांनी ग्रह करून घेतला. मग बागेत जाणंच कमी झालं. त्यापेक्षा देवळात बसणं बरं वाटे.

आज दादांचा ताप उतरला होता. पण औषध सुरू ठेवायचं होतं. जितूकडेपैसे मागणं जिवावर आलं. पण शेवटी मागितलेच.

त्यानं चेहरा जरा त्रासिक केला. "बरोबर! आपल्या दोघांसाठी खर्च करणं जिवावर येतं यांना "

पैसे घेऊन त्यांनी जपून बटव्यात ठेवले. 'उद्या सकाळी आधी औषधं आणू'. पैसे उरले तर दोन फळं आणू.

रात्री जितू सुरूचि खूप वेळ हळूहळू बोलत होते. त्याची चाहूल लागून त्या उगीच ओशाळ्या झाल्या. हल्ली दोघंच सतत काही बोलत असत. काय म्हणून विचारणं काही झालं नाही.

मागच्या वर्षी दादांना टायफॉईड झाला होता. निदान करण्याऐवजी डॉक्टरांनी दहा टेस्ट मात्र करायला लावल्या. डायबेटीस आहेच त्याना. मग काही त्रास उद्भवायला नको म्हणून हॉस्पिटल मधे ठेवलं. खूप खर्च झाला. मीराताईंनी एकुलता एक पाटलीजोड विकला शेवटी. पण जितू सुरूचि नको विकू म्हणाले नाहीत. त्या खरंच दुखावल्या होत्या. पण ओशाळपण टळलं अशी समजूत घालून घेऊन गप्पच राहिल्या. निभावलं तेही. "अरे तुझे वडील आहेत ना ते? नसतील यशस्वी फारसे. पण तुला लहानाचा मोठा त्यांनीच केला ना रे?" त्यांनी मनातच जितूला विचारलं. आताशा त्या मनातच द्वंद्व मांडत. समस्यांची उत्तरं मनातच शोधत.

पाटल्यांशिवायचा हात त्यांनी कुरवाळला. खिन्नपणे त्या उठल्या. सुरूचि उठून स्वयपाकाला लागली होती. त्याही मग ऊठल्याच. पोळपाट ताब्यात घेऊन सरसर पोळ्यांची चवड रचली. त्या दोघांचे डबे, चिरागचा खाऊचा डबा भरला. जो तो आपल्या कामाला लागला. दादा उठून बसले. "आज बरा आहे मी. चिरागला बालवाडीत नेतो मी" ते म्हणाले. पण सुरूचिनं "नाही" म्हणून बजावून सांगितलं तशी ते गप्प बसले. "ऊगीच इन्फेक्शन नको. शिवाय तुम्ही पण लगेच दगदग करू नका" मी सोडीन त्याला. तिनं म्हटलं.

चिरागला बालवाडीतून आणायला त्या गेल्या. येताना जिना चढवेना. पसतीस पायर्या होत्या. त्याना हल्लक वाटू लागलं. आताशा असं फार वेळा होतं. पण सांगणार कुणाला? त्या कशाबशा घरी पोचल्या.

दादांनी गार पाणी आणून दिलं. पाणी पिऊन त्याना जरा बरं वाटल. मग दिवस रोजच्यासारखा पार पडला. पण दिवस रोजच्यासारखा संपायचा मात्र नव्हता.

संध्याकाळी जितू आला तोच मुळी हसतमुखानं!

हल्ली असं क्वचितच घडायचं. त्यानं मिठाईचा बॉक्स आईच्या हातात देत म्हटलं" आई, देवाला ठेव. व तुम्ही दोघं तोंड गोड करा."मीराताईंनी भांबावून बॉक्स घेऊन सुरूचिकडे दिला. ती पण प्रसन्न हसली. देवाला बर्फी ठेवून तिनं, ती सर्वांना दिली. दादांनी हसत विचारलं" काय रे, आज काय, विशेष? पगार वाढला का? काय ग सुरुचि, तू तरी सांग म्हातार्यांना?"

"दादा पगाराचं काय, तो वाढेल पण आज त्याहून गोड बातमी देणार आहे" जितू बूट जाग्यावर ठेवत म्हणाला.

"तूच सांग ना सुरूचि! हा खरा, तर तुझा प्लॅन होता!"

"सांगते. पण तू तो बटवा आईदादांच्या हाती दे आधी".

"हो.. हो.. तर!"

एक मखमली बटवा त्यानं दादांच्या हाती दिला. व एक मखमली मोठी डबी आईला दिलीन. हे दोघे आपले चकितच झाले. "आई, दादा, उघडून पहा ना हो" सुरुचि अधीरपणे म्हणाली. मीराताईंनी डबी उघडली. गुलाबी कागदात लखलख करणारा पाटलीजोड होता. मीराताईंच्या तोंडून शब्द फुटेना. "हे रे काय?" त्या कशाबशा म्हणाल्या. दादांनी बटवा उघडला. आत सुंदर कीचेनला लावलेल्या किल्ल्या होत्या. "आई, दादा, आपण लवकरच, कदाचित उद्यापरवाच आपल्या स्वतःच्या प्रशस्त फ्लॅटमधे जाणार आहोत.त्याच्याच चाव्या आहेत या. आम्ही तुम्हाला सरप्राईज द्यायचं. ठरवलं होतं. "खरं म्हणजे हे कसं पार पडेल याविषयी आम्हीच साशंक होतो. पण गेले तीन वर्षं आम्ही सतत काटकसर करत होतो. कर्जं मंजूर होण्यापासून फिटेपर्यंत अनेक

फॉरमॅलिटिज असतात. शिवाय बिल्डर वेळेवर ताबा देण्याचं टेन्शन होतं ते वेगळंच" सूरुचि एकीकडे चिरागला मंमं भरवत सांगू लागली.

"आई अग, सुरेख चार खोल्यांचा फ्लॅट आहे. चोवीस तास पाणी असणार आहे.तुला आता दुपारी विश्रांति मिळेल. शिवाय लिफ्ट आहे. म्हणजे रोज पस्तीस पायर्या चढायला नकोत. खाली गार्डन आहे. तिथे चिरागला घेऊन दोघं मजेनी बसा." जितू सांगत होता.

"अग पण सुरुचि या पाटल्या कुणाच्या?" मीराताईंनी भांबावून विचारलं "आई,अहो मी माहेरी पैसे देते हे तर तुम्हाला माहीतच आहे. पण सचिनला माझ्या भावाला नोकरी लागल्यानंतर आईनं पैसे घ्यायचं नाकारलं. मी ऐकत नव्हते तर तिनं ते पैसे बाजूला टाकून मला सगळेच्या सगळे परत केले.त्यात भर घालून आम्ही तुम्हाला पाटल्या केल्या. आईनं मला सरप्राईज दिलं तसंच, आम्ही तुम्हाला सरप्राईज दिलं. दादांच्या हॉस्पिटल च्या बिलासाठी तुमच्या पाटल्या विकल्या ते मनाला फार लागलं जितूला"

दादा, मीराताई थक्क होऊन ऐकतच राहिले. आनंदानं तोंडातून शब्दच फुटेना.

“एवढ्यानं झालं नाही दादा. पुढे ऐका. मी चारचाकी गाडी पण बुक केली व ती पण आता घरी येईल लवकरच. इथे पार्किंग नाही म्हणून थांबलो होतो. उद्याच जाऊ शोरूमला. यासाठी गेली तीन वर्षं आम्हाला खडूसपणे वागावं लागलं. जमेल तिथे व तशी काटकसर करत होतो. उघड बोलताही येत नव्हतं आईच्या डोळ्यातलं दुखावलेपण पाहून न पाहिल्यासारखं करत होतो आम्ही. आई क्षमा कर, आमच्या कठोरपणाबद्दल."

"अरे क्षमा मीच मागते देवाकडे. नाही नाही ते विचार करत होते". अश्रू आवरत मीराताई पुटपुटल्या.

"जाऊ द्या रे बाळांनो, ज्याचा शेवट गोड ते सारंच गोड. ऑल इज वेल दॅट एन्ड्स वेल" दादांनी पूर्णविराम देत म्हंटलं.

***समाप्त***